गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३

अधिसूचना

क्रमांक :१३९/२०२३ दिनांक : ३१/०८/२०२३

विषय : सी.जी.एस. पद्धतीमधील प्रथम वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस. पद्धतीमध्ये द्वितीय वर्षामध्ये प्रवेश देण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून पदवी स्तरावरील शिखर संस्थांद्वारा संचालित अभ्यासक्रम जसे, फार्मसी, लॉ, एज्युकेशन, फिजीकल एज्युकेशन, एम.बी.ए., इंजिनिअरिंग याव्यतिरिक्त ईतर सर्व अभ्यासक्रमांस सी.बी.सी.एस. प्रणाली लागू करण्यांत आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ हे या प्रणालीचे द्वितीय वर्ष आहे.

या अनुषंगाने सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यांत येते की, शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ व त्यापूर्वीच्या विविध विद्याशाखांमधील स्नातक स्तरावरील सी.जी.एस.पध्दतीनुसार प्रथम वर्ष परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यानंतर २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाकरिता काही तांत्रिक कारणांमुळे प्रवेश न घेतलेल्या (खंड पडलेल्या) विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस. पध्दतीमध्ये २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात द्वितीय वर्ष तृतीय सत्रामध्ये प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतला आहे.

परंतु, अशा सी.जी.एस. पध्दतीमधील प्रथम वर्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस. पध्दतीमधील सत्र १ व २ ला अतिरिक्त असलेले विषय/बाबी जसेः जेनेरिक ओपन ईलेक्टीव्ह कोर्स, ॲबिलिटी एन्हांसमेंट कोर्स (महाविद्यालयीन स्तरावरील) बाबी उत्तीर्ण/पूर्ण करणे अनिवार्य राहील.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

*****